**सं. फौ. खटला क्र.१३४/२०१५**

**निशाणी क्र.१५**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०२ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : यशपाल महादेव सातपुते,

**वय** : ४१ वर्षे, **काम** : कृषी अधिकारी पंचायत समिती, अहमदपूर, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी वर्ष २०१४ ते ३०/०८/२०१५ पर्यत पंचायत समिती देवणी येथे गुण नियंत्रक तथा कृषी अधिकारी या पदावर कार्यरत होतो. मी दि.०९/१२/२०१४ रोजी तुषार कृषी सेवा केंद्र जवळगा येथून संशयित सिंगल सुपर फॉस्फेट १६% ग्रॅन्युलर, २० बॅग, प्रती ५० किलो यामधून एका बॅगमधील रासायनिक खताचा नमुना घेतला होता आणि पॉलिथिन बॅगमध्ये हवाबंद केला व कोरड्या कापडी पिशवीमध्ये सिलबंद केला. मी नमुना सिलबंद करण्यापूर्वी प्रपत्र 'पी' तयार केले होते. आता मला प्रपत्र 'पी' दाखवले. हे तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२८** देण्यात येते. त्यानंतर मी प्रपत्र 'जे' तयार केले आणि त्यामध्ये नमुन्याचा उल्लेख केला. आता मला प्रपत्र 'जे' दाखवले. हे तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२९** देण्यात येते.

०२. मी घेतलेल्या तीन नमुन्यापैकी एक नमुना डिलर म्हणजे तुषार कृषी सेवा केंद्राचे चालक सुभाष गिरीधर पाटील यांना दिला आणि दोन साक्षीदारांसमक्ष त्याची पोच घेतली. मी दुसरा नमुना माझे वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविला. मी तिसरा नमुना रासायनिक परीक्षणाकरिता पाठविला आणि त्याबाबत प्रपत्र 'के' तयार केले. आता मला प्रपत्र 'के' दाखवले. हे तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.३०** देण्यात येते. रासायनिक परीक्षणाचा अहवाल (नि.२५) प्रमाणे सदर नमुना अप्रमाणित होता.

०३. त्यानंतर मी संबंधित कंपनी, वितरक आणि विक्रेता यांना कारणेदाखवा नोटीस दि.२०/०२/२०१५ रोजी दिली. आता मला नोटीस दाखविली. ही तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.३१** देण्यात येते. उत्पादक कंपनीने विभागीय कृषी सहसंचालक लातूर यांच्याकडे अपील केले आणि नमुन्याचे पुनृपरीक्षणाची विनंती केली. त्याप्रमाणे माझे वरिष्ठांकडे ठेवलेला नमुना पुनृपरीक्षणाकरिता जोधपूर येथील प्रयोगशाळेत पाठविला. त्याप्रमाणे नमुना अप्रमाणित असल्याचा अहवाल दिला. त्याप्रमाणे मला विभागीय कृषी सहसंचालक यांनी सदर अहवाल कळविला. आता मला त्याचे पत्र दाखविले. हे तेच आहे. त्यावर प्राप्त म्हणून माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.३२** देण्यात येते. मी तो अहवाल श्री. अमोल सुबराव गायकवाड यांना पाठविला. त्यानंतर माझी बदली झाली आणि माझा कार्यभार दि.३१/०५/२०१५ रोजी श्री. अमोल सुबराव गायकवाड यांना दिला.

सरतपास पूर्ण.

**:: <u>आरोपी क्र.३ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एस. पी. कांबळे यांच्यामार्फत</u> ::**

०४. माझे शिक्षण बी.एस.सी. ॲग्रीमध्ये झाले. मला छापा टाकायचे झाल्यास कार्यालयाला कळविण्याची आवश्यकता नाही. मी नमूद कार्यवाहीच्या संबंधी नोंदवही ठेवतो. तुषार कृषी सेवा केंद्र हे माझ्या पूर्वीच्या परिचयाचे नव्हते. सदर आस्थापना हे दुकान होते. मी तेथे गेलो त्यावेळी दुकान उघडे होते. सदर दुकान हे मोठे आणि खेळत्या हवेचे होते हे मला आठवत नाही. सदर दुकानदाराकडे खत विक्रीचा परवाना होता. सदर दुकानातील बॅग मशिनने शिवलेल्या मूळ पॅकिंगमध्ये होत्या. सदर खत हे दाणेदार स्वरुपात होते. सदर खतातील घटकाचे प्रमाणे प्रवासादरम्यान कमी जास्त होऊ शकते याबाबत मी सांगू शकत नाही. मी बांबूने बॅगमधून नमुना घेतला, परंतु बॅगचे तोंड उघडले नव्हते. मी घेतलेला नमुना मिक्स केला होता. मी दोन पंचांसमक्ष त्याचा पंचनामा केला होता. प्रपत्र 'जे' म्हणजे पंचनामा आहे. त्यामध्ये नमुना घेण्याच्या पध्दतीबाबत नमूद केलेले नाही.

०५. नमूद कार्यवाहीच्या वेळी थंडीचे दिवस होते हे मला आठवत नाही.

थंडीच्या दिवसात आद्रता असते आणि त्यामुळे उघड्या केलेल्या खतातील घटक कमी जास्त होऊ शकते हे मी सांगू शकत नाही. त्याबाबत तज्ञ सांगू शकतात. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर आणि खताचे नमुने घेतल्याबाबत खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

:: **<u>आरोपी क्र.१ व २ हे नियमित गैरहजर आहेत. आरोपी क्र.३ विरुध्द प्रकरण वेगळी संपरिक्षा करुन चालविलेले आहे. सबब त्यांची नोंद घेतली.</u>** ::

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत　　　　　　　　सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.
दि.११/०८/२०२६.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.